POSHAN Abhiyaan
PM's Overarching Scheme for Holistic Nourishment
सही पोषण - देश रोशन

सत्यमेव जयते

नए समाज की ओर


# अशक्त नवजात बालकाची ओळख व संगोपन



5

महिला व बालविकास मंत्रालय,
भारत सरकार, २०१८





# कोणती बालके जीवित राहणार नाहीत हे लोकांना आधीपासूनच माहीत असते का?

कार्ड दाखवा.

चर्चा सुरु करण्यापूर्वी कार्यकर्त्यांना खालील प्रश्न विचारा.

1. बालकाचा जन्म होताच कुटुंबातील लोकांना याची चाहूल लागते का, की कदाचित हे बालक वाचणार नाही?
2. अशी कोणती लक्षणे आहेत की ज्यांच्यामुळे बालक वाचणार नाही असे लोक समजून जातात.
3. अशा परिस्थितीत बालकाची स्थिती योग्य नसल्या बाबत कोण सल्ला देते? काही जेष्ठनागरिक, गावातील दाई किंवा इतर कोणी?

कोणत्याही प्रकारचे बरोबर उत्तर आपल्याकडून सांगू नका. काही वेळ चर्चा केल्यानंतर पुढील कार्डावर जा.






# बालकाचा जन्म होताच कुटुंबातील लोकांना याची चाहूल लागते का, की कदाचित हे बालक वाचणार नाही?

## या बाबत लोकांची काय धारणा आहे?

- असे कोणते कारण आहे की ज्यामुळे बालकांचा मृत्यू होतो?
- एखादे बालक जिवंत राहणार नाही हेकसे ओळखतात?



# कोणत्या बालकांची जिवंत राहण्याची शक्यता अधिक आहे, हे चिकित्सक कसे ओळखतात?

कार्ड दाखवा.

कार्यकर्त्यांशी चर्चा करा.

दाखविण्यात येणारे आकडे आपल्याच राज्यातील एका जिल्ह्याचे आहेत. तक्ता काळजीपूर्वक वाचा.

तक्त्यामध्ये दर्शविण्यात आलेल्या आकड्यांवरून तुम्हांला काय समजते हेविचारा.

एखाद्या उत्साही कार्यकर्त्याला हे आकडे वाचावयास व समजावण्यास सांगा आणि इतर कार्यकर्त्यांना उत्तर देण्याची व चर्चा करण्याची संधी द्या.

काही वेळ चर्चा झाल्यानंतर उजवीकडे लिहिलेल्या माहितीच्या आधारे समजावून सांगा.

भारतातील काही राज्यांमध्ये जन्म घेणाऱ्या दर १००० बालकां पैकी अंदाजे ३० बालकांचा एक महिन्याच्या आत मृत्यू होतो. ही आकडेवारी तक्त्यामध्ये शेवटच्या ओळीत दर्शविण्यात आली आहे.

जेव्हा एखादे बालक आईच्या गर्भाशयामध्ये साडेआठ महिन्यांहून कमी कालावधी पूर्ण होण्याआधी जन्माला येते तेव्हा त्याप्रसूतीला आपण अकाल प्रसूती म्हणतो. जन्म घेणाऱ्या दर १००० पैकी एकूण १०० बालके अकाली जन्मलेली असतात. अशा बालकांचे वजन साधारणतः २ किलोपेक्षा कमी असते. ही आकडेवारीही तक्त्यामध्ये दर्शविण्यात आली आहे.

आपण तक्त्यामध्ये आकड्यांच्या रूपात पाहू शकतो की, १०० पैकी मृत पावणाऱ्या ३० बालकां पैकी २० बालके अशी असतात, ज्यांचा जन्म अकाली झाला आहे किंवा ज्यांचे वजन २ किलोपेक्षा कमी आहे. मात्र प्रसूतिकाळ पूर्ण झाल्यानंतर जन्मलेल्या किंवा जन्माच्या वेळेस ज्यांचे वजन २ किलोहून अधिक असलेल्या ९०० बालकां पैकी केवळ १० बालकेच मृत पावल्याचे आढळून आले. ही आकडेवारीही तक्त्यामध्ये दर्शविण्यात आली आहे.

जन्माला येणाऱ्या दर १००० बालकांपैकी मृत बालकांची संख्या वाढणे किंवा घटणे हे यावर अवलंबून असते की, आपण आपल्या बालकांची निगा कशा प्रकारे राखतो. काही राज्यांमध्येही संख्या अतिशय कमी आहे. याचा असा अर्थ होतो की, जर आपण आपल्या बालकांची देखभाल चांगल्या प्रकारे केल्यास आपण बालमृत्यूवर नियंत्रण मिळवू शकतो.




# कोणत्या बालकांची जिवंत राहण्याची शक्यता अधिक आहे, हे चिकित्सक कसे ओळखतात?



गर्भावस्थेतील बालकाचे वय किंवा त्याच्या वजनाच्या आधारे कोणते बालक जिवंत राहण्याची शक्यता अधिक आहे हे जाणणे शक्य आहे.

| बालक कोणत्या महिन्यात जन्माला आले? जन्माच्या वेळी त्याचे वजन काय होते? | जन्माला आलेल्या बालकांची एकूण संख्या? | जन्मानंतर १ महिन्यात मृत पावलेल्या बालकांची संख्या? |
|---|---|---|
| साडे आठ महिन्यांच्या गर्भावस्थेनंतर जन्मलेली किंवा जन्मतः २ किलोहून अधिक वजन असलेली बालके | 900 | 10 |
| साडे आठ महिन्यांच्या गर्भावस्थेपूर्वी जन्मलेली किंवा जन्मतः २ किलोहून कमी वजन असलेली बालके | 100 | 20 |
| **एकूण** | 1000 | 30 |



# बालक अशक्त आहे हे त्याच्या जन्माच्या वेळी कसे ओळखाल?

कार्डदाखवा.

उजवीकडे दिलेल्या माहितीच्या आधारे समजावून सांगा की, बालकाच्या जन्मानंतर लगेचच अशक्त बालक कसे ओळखतात.
त्यांना सांगावे की, आशा मोड्यूल ७ च्या सी भागातील पान नं. ४९ नुसार ही बाब त्यांना याआधीही सांगण्यात आली आहे.
त्यांना सांगावे की, हीच बाब आय. सी. डी. एस. च्या नव्या रजिस्टर नं. ८ व ९ मध्येही सांगण्यात आली आहे. त्या सोबत गृहभेट रजिस्टर च्या सूचनेच्या यादी मध्येही बाब सांगण्यात आली आहे.
वरील तिन्ही मुद्दे कार्यकर्त्यांना समजल्या नंतर त्यांना विचारा.

अशक्त बालके व आजारी बालके यांच्यात काय फरक असतो? नवजात बालकाच्या संगोपना बाबत असलेल्या आधीच्या पाठातून आपण काय शिकलो हे आठविण्याचा प्रयत्न करावा.

कार्यकर्त्यांनी उत्तरे दिल्यानंतरच तुम्ही उत्तर द्या.

जे बालक जन्मल्यानंतर गरजेनुसार ताकद लावून स्तनपान करू शकत नाही, त्याला अशक्त बालक म्हटले जाते.
जे बालक पूर्वी चांगल्या प्रकारे स्तनपान करीत होते पण हल्ली त्याचे स्तनपानातील स्वारस्य कमी झाले आहे आणि सोबतच त्याची क्रियाशीलता कमी झाल्याचे निदर्शनास आले आहे, असे बालक आजारी बालक म्हटले जाते.
दोन्हीं मधील फरक समजावून घेणे महत्वाचे आहे. अशक्त बालकाची निगा घरी घेता येऊ शकतेपण आजारी बालकाचे प्राण वाचविण्यासाठी त्याला ताबडतोब इस्पितळात घेऊन गेले पाहिजे.

आता आपण बालकाच्या जन्मानंतर लगेचच कमजोर बालक ओळखण्यास शिकूया. जर तुम्हाला नवजात बालकामध्ये खालीलपैकी कोणतेही लक्षण दिसून आल्यास त्याला कमजोर मानण्यात येईल.

1. गर्भावस्थेचे साडेआठ महिने किंवा ३७ आठवडे पूर्ण होण्या आधीच जर बालकाचा जन्म झाला असेल तर तुम्हाला हे कसे कळू शकेल? (जर तुम्हाला बाळंतिणीची एल. एम. पी. तारीख ठाऊक असेल तर बालकाचा जन्म किती दिवस आधी झाला आहेहे तुम्हाला कळू शकते. लवकरच आपण एल. एम. पी., ई. डी. डी. तक्त्यांचा वापर करून याची गणना करण्यास शिकणार आहोत.)

2. जन्माच्या वेळेस बालकाचे वजन २ किलोहून कमी असेल तर तुम्हाला हे कसे कळू शकेल? (जर तुम्ही बालकाच्या जन्मानंतर ताबडतोब त्याचे वजन केले असेल तर तुम्हाला याची माहिती मिळू शकेल.)

3. बालक जन्मानंतर आवश्यकतेनुसार ताकद लावून स्तनपान करू शकत नसेल तर तुम्हाला हे कसे कळू शकेल? जर तुम्ही बालकाच्या जन्मानंतर लवकरात लवकर त्याला स्तनपान करताना लक्षपूर्वक पाहिले असेल तर याबाबत आपण नवजात बालकाच्या देखभाली बद्दल केलेल्या आधीच्या चर्चेतून समजावून घेतले आहे.

जर बालकामध्ये वरील तीनपैकी एखादे लक्षण जरी दिसून आले तर त्याला "अशक्त बालक" समजण्यात यावे. अशा बालकांना जिवंत ठेवण्यासाठी त्यांची अतिरिक्त काळजी घेणे अत्यावश्यक असते.



# बालकाच्या जन्मानंतर ते अशक्त असल्याचे कसे ओळखाल?



खालीलपैकी कोणतेही एक लक्षण बालकामध्ये आढळून आल्यास त्याला अशक्त मानले जाऊ शकते:



1. साडेआठ महिनेपूर्ण होण्या आधी बालकाचा जन्म झालेला असल्यास.
2. जन्मतः बालकाचे वजन २ किलोग्रॅम पेक्षा कमी असल्यास.
3. जन्मानंतर बालक आवश्यकतेनुसार ताकद लावून स्तनपान करू शकत नसेल तर.








# एल. एम. पी. वरून गर्भाच्या पूर्णावस्थेची तिथी कशी काढाल?





कार्डदाखवा.
कार्यकर्त्यांना एल. एम. पी. ई. डी. डी., डी. ओ. एम. ची गणना करणारे पान उघडण्यास सांगा. त्यांना विचाराकी, त्यांनी यापूर्वी कधी एखाद्या गर्भवती महिलेची ई. डी. डी. (प्रसूतीची संभाव्य तिथी) काढण्यासाठी या शीटचा उपयोग केला आहे का? त्यांना विचारा की, त्यांनी यापूर्वी कधी एखाद्या गर्भवती महिलेची डी. ओ. एम. (परिपक्वतेची तिथी) काढण्यासाठी या शीटचा उपयोग केला आहे का? कार्यकर्त्यांना एखाद्या महिलेच्या एल. एम. पी. वरून तिची ई. डी. डी. व डी. ओ. एम. काढण्यास सांगा. (उदाहरणादाखल एल. एम. पी., ई. डी. डी. व डी. ओ. एम. पाना वरील कोणत्याही महिलेच्या एल. एम. पी. चा वापर करा.) कार्यकर्त्यांनी याबाबत प्रयत्न करून झाल्यानंतर उजवीकडे दिलेल्या माहितीच्या आधारे त्यांना ई. डी. डी. व डी. ओ. एम. काढण्याच्या शीटच्या माध्यमातून गणना करण्यास शिकवा.
कार्यकर्त्यांना अन्य दोन महिलांच्या एल. एम. पी. वरून ई. डी. डी. व डी. ओ. एम. काढण्यास सांगा. (उदाहरणा दाखल एल. एम. पी., ई. डी. डी. व डी. ओ. एम. पाना वरील कोणत्याही महिलेच्या एल. एम. पी. चा वापर करा.) कार्यकर्त्यांना हे समजून घेण्यासाठी थोडा वेळ द्या. कोणता कार्यकर्ता कमी वेळेत बरोबर तिथीची गणना करतो आहे, हे पहा. या कार्यकर्त्यांना इतरांना तिथींची गणना शिकविताना साहाय्य करावयास सांगा.

खालीलमुद्यांवरजोरद्या.

- गर्भावस्थेतील साडेआठ महिने किंवा ३७ आठवडे पूर्ण होण्याआधी जन्माला आलेल्या बालकाला "अपरिपक्व बालक" म्हणतात. अशा बालकांना जीवित ठेवण्यासाठी त्यांची अतिरिक्त देखभाल ठेवण्याची आवश्यकता असते. त्यामुळे जन्मल्यानंतर लवकरात लवकर अशा बालकांना ओळखणे गरजेचे असते.
- जर एखाद्या महिलेस तिच्या गर्भावस्थेच्या परिपक्वतेच्या तिथी पूर्वीच प्रसूतीच्या कळा सुरु झाल्यास ती अपरिपक्व बालकास जन्म देण्याची शक्यता असते. अशा प्रकार ची प्रसूती इस्पितळातच करण्यात यावी.
- परिपक्वतेची तिथी अतिशय महत्वाची असल्यामुळे ती माहित झाल्यानंतर गृहभेट रजिस्टर मध्ये प्रसूतीच्या अनुमानित तिथी सोबतच ही तिथी देखील लिहिण्यात यावी. अशा प्रकारे प्रसूतीच्या कळा सुरु झाल्यानंतर आपण जाणून घेऊ शकतो की, प्रसूती अपरिपक्व नाहीना? किंवा परिपक्वतेची तिथी नियोजित तिथीच्या पुढे नाही गेली ना?

तक्ता क्र. ३चा उपयोग

- तक्ता क्र. ३ मध्ये पहिल्या ओळीत अंतिम मासिक पाळीच्या तिथीस लिहिले गेले आहे. (एल. एम. पी.)
- दुसऱ्या ओळीत प्रसूतीची संभाव्य तिथी लिहिण्यात आली आहे. (ई. डी. डी.)
- तिसऱ्या ओळीत परिपक्वतेची तिथी लिहिण्यात आले आहे. (डी. ओ. एम.)

**उदाहरण:** सलमाची अंतिम मासिक पाळीची तारीख १० जून आहे. अंतिम पाळीच्या तारखेस लिहा. "जून" वाल्या ओळीत "१०" हा अंक शोधा. यादुसऱ्या ओळीत "१०" च्याखाली "१७" तारीख लिहिलेली आहे. यातून तुम्हाला कळेल की, ही ओळ "८" मार्चला सुरु होते व "६" एप्रिलला समाप्त होते. याचा अर्थ "१७" मार्चही प्रसूतीची संभाव्य तिथी आहे. तिसऱ्या ओळीत १० च्याखाली २४ तारीख आहे. यातून तुम्हाला कळेल की, ही ओळ १५ फेब्रुवारीला सुरु होते व १६ मार्चला समाप्त होते. याचा अर्थ २४ फेब्रुवारी ही परिपक्वतेची तिथी आहे.



# एल.एम.पी. से परिपक्वता की तिथि कैसे निकालेगें?



**तालिका: प्रसव की सम्भावित तिथि (EDD) तथा समय से पूर्व जन्म गणना**

(परिपक्वता तिथि से पूर्व कोई भी जन्म असामयिक है)

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जनवरी | अन्तिममाहवारीकादिनांक (LMP) | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | जनवरी |
| अक्टूबर | प्रसवकीसम्भावितितिथि (EDD) | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | नवम्बर |
| सितम्बर | परिपक्वताकीतिथि (DOM) | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | अक्टूबर |
| फरवरी | अन्तिममाहवारीकादिनांक (LMP) | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | | | | फरवरी |
| नवम्बर | प्रसवकीसम्भावितितिथि (EDD) | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | | | | दिसम्बर |
| अक्टूबर | परिपक्वताकीतिथि (DOM) | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | | | | नवम्बर |
| मार्च | अन्तिममाहवारीकादिनांक (LMP) | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | मार्च |
| दिसम्बर | प्रसवकीसम्भावितितिथि (EDD) | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | जनवरी |
| नवम्बर | परिपक्वताकीतिथि (DOM) | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | दिसम्बर |
| अप्रैल | अन्तिममाहवारीकादिनांक (LMP) | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | अप्रैल |
| जनवरी | प्रसवकीसम्भावितितिथि (EDD) | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | 1 | 2 | 3 | 4 | | फरवरी |
| दिसम्बर | परिपक्वताकीतिथि (DOM) | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | | जनवरी |
| मई | अन्तिममाहवा रीकादिनांक (LMP) | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | मई |
| फरवरी | प्रसवकीसम्भावितितिथि (EDD) | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | मार्च |
| जनवरी | परिपक्वताकीतिथि (DOM) | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | फरवरी |
| जून | अन्तिममाहवारीकादिनांक (LMP) | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | जून |
| मार्च | प्रसवकीसम्भावितितिथि (EDD) | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | | अप्रैल |
| फरवरी | परिपक्वताकीतिथि (DOM) | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | | मार्च |
| जुलाई | अन्तिममाहवारीकादिनांक (LMP) | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | जुलाई |
| अप्रैल | प्रसवकीसम्भावितितिथि (EDD) | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | मई |
| मार्च | परिपक्वताकीतिथि (DOM) | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | अप्रैल |
| अगस्त | अन्तिममाहवारीकादिनांक (LMP) | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | अगस्त |
| मई | प्रसवकीसम्भावितितिथि (EDD) | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | जून |
| अप्रैल | परिपक्वताकीतिथि (DOM) | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | मई |



कार्डदाखवा.

कार्यकर्त्यांना विचारा.
या तिन्ही मुद्यां पैकी प्रत्येक मुद्याचा काय अर्थ आहे?
उजवीकडे दिलेल्या माहितीच्या आधारे अशक्त बालकांची निगा कशी राखाल याबाबत त्यांना समजवा.
त्यांना सांगा की, आशा मोड्यूल ७ च्या भाग "सी" च्या पान क्र. ५० नुसार ही बाब त्यांना या आधीही सांगण्यात आली आहे.

सांगा:
हीच बाब आय. सी. डी. एस. च्या नव्या एम. आय. एस. च्या मार्गदर्शिकेच्या ९व्या धड्यातही सांगण्यात आली आहे. त्या सोबत गृहभेट रजिस्टरच्या सूचनेच्या यादीमध्ये ही बाब सांगण्यात आली आहे.
त्यांना सांगावे की, त्यांच्या जवळ एस. एन. सी. यु. किंवा तत्सम दुसरी सुविधा उपलब्ध आले आणि त्यांचे कुटुंब तेथील खर्च करण्यास समर्थ असेल तर बालकाला ताबडतोब तेथे दाखल करण्यात यावे. हे शक्य नसेल तर उजवीकडे दिलेल्या माहितीचे काटेकोरपणे पालन करून बालकाची घरच्या घरीच योग्य काळजी घेण्यात आली पाहिजे.

**सर्व नवजात बालकांना एक समान मूलभूत देखभालीची आवश्यकता असते.**

- जन्मानंतर लगेचच बालकाला स्तनपान करण्यात यावे आणि त्याला कोणत्याही प्रकारचे घरगुती औषध किंवा पातळ पदार्थ देण्यात येऊ नयेत.
- बालकाला सदैव ऊब मिळत रहावी म्हणून जन्मावेळी सुक्या कापडाने पुसण्यात यावे आणि स्वच्छ व सुक्या सुती कापडात गुंडाळून आई जवळ ठेवावे.
- स्वच्छते विषयीच्या पंचसूत्रांचा उपयोग करावा. खास करून काळजी घ्यावी की बालकाची नाळ नवीन व स्वच्छ ब्लेडने कापण्यात यावी व स्वच्छ धाग्याने बांधण्यात यावी आणि नाळेवर काहीही लावण्यात येऊ नये.
- अशा प्रकारे देखभाल केल्यास बालकांना प्रादुर्भावा पासून व आजारां पासून वाचविण्यात येऊ शकते.
- पूर्ण दिवसभरण्या आधीच जन्माला आलेल्या बालकांची अतिरिक्त काळजी घ्यावी लागते कारण जंतूंच्या प्रादुर्भावा मुळे ती आजारी पडण्याची अधिक शक्यता असते.
- स्तनपाना शिवाय बालकाला काहीही देण्यात येऊ नये आणि स्तनपान वारंवार करण्यात यावे. अशक्त व लहान बालकांना प्रत्येक तासाला झोपेतून जागे करून स्तनपान करणे आवश्यक आहे कारण अशक्तपणामुळे ते एका वेळेस अधिक दूध पिण्यास सक्षम नसतात.
- परिपक्व बालकांपेक्षा अशक्त बालकांना ऊबेची अधिक आवश्यकता असते. या साठी कांगारू पद्धती नेत्यांची देखभाल करणे हा सर्वोत्तम उपाय आहे. याविषयी आपण नंतर सविस्तरपणे शिकणार आहोत. खोलीस इतके ऊबदार ठेवावे की तेथे एखाद्या प्रौढ व्यक्तीस घाम येईल. अशा प्रकारची व्यवस्था थंडीच्या दिवसात रात्री तापमान कमी झाल्या नंतर किंवा पावसाळ्यात आवश्यक असते. जन्मानंतर १ आठवडा होई पर्यंत बालकाला अंघोळ घालू नये.
- बालकाला स्पर्श करण्या आधी, त्याची स्वच्छता करण्याआधी किंवा कपडे बदलण्या आधी सदैव आपले हात धुवावेत. बालकाच्या नाळेला नेहमी स्वच्छ व कोरडे ठेवावे. तसेच नाळेवर काहीही लावू नये. इतकेच नव्हे तर नाळ सुकून गळून पडल्यानंतर ही त्या जागी काहीही लावू नये.

**सारांश:** वेळेआधी जन्मलेल्या बालकाला अतिरिक्त स्तनपान, अतिरिक्त ऊब व अतिरिक्त साफसफाईची व स्वच्छतेची आवश्यकता असते.



# अशक्त बालकाला जिवंत ठेवण्यासाठी कशाप्रकारे मदत कराल?



सलग स्तनपान




कांगारू पद्धतीने देखभाल



साफ सफाई व स्वच्छता अत्यावश्यक





# जन्माच्यावेळी अशक्तपणे जन्मास आलेले कोणतेही बालक आपल्या नजरेतून निसटणार नाही, याची खात्री कशी कराल?



कार्डदाखवा.

कोणत्याही एका कार्यकर्त्याला एका मागून एक प्रश्न विचारण्यास सांगा आणि इतर कार्यकर्त्यांना त्याप्रश्नांची उत्तरे देण्यास सांगा.

उजवीकडे दिलेल्या माहितीच्या आधारे चर्चा पुढे चालू ठेवा.

1. आपल्याकडे प्रत्येक गर्भवती महिलेची एल. एम. पी. आहे याची आपण खात्री कशी करू शकतो?
   - गर्भावस्थेची नोंदणी लवकरात लवकर करावी आणि महिलेकडून तिची एल. एम. पी. ची तारीख विसरण्या आधी ती खात्रीशीरपणे लिहून ठेवावी.
   - त्यानंतर ई. ई. डी. व डी. ओ. एम. ची माहिती नर्स किंवा डॉक्टरच्या मदतीने घेतली जाऊ शकते. मात्र दर वेळी ही माहिती मिळेल हे गरजेचे नाही.
   - डी. ओ. एम. ची माहिती मिळताच डी. ओ. एम. सोबतच ई. डी. डी. देखील गृहभेट रजिस्टर मध्ये लिहून ठेवावी.

2. जन्माच्या वेळी बालकाचे बरोबर वजन घेतले जाईल, याची खात्री कशी कराल?
   - बालकाच्या जन्माच्या वेळी इस्पितळामध्ये बालकाचे वजन घेतले व लिहिले जाईल यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात यावेत. आपल्या बालकाच्या वजना संबंधित कागद पालकांना दिले जातील याची पालकां कडून खात्री करण्यात यावी.
   - बालकाच्या जन्मानंतर तीन दिवसांपर्यंत त्याचे वजन घरीही घेतले जाऊ शकते. यासाठी बालकांचे वजन करण्याच्या यंत्राचा वापर करण्यात यावा.

3. जन्माच्या वेळी बालकाचे वजन उपलब्ध नसेल आणि महिलेच्या एल. एम. पी. ची माहिती उपलब्ध नसेल तर काय करावे?
   - वरील माहिती उपलब्ध असो किंवा नसो, अशा अवस्थेत जन्माच्या दिवशी किंवा इस्पितळातून घरी परतण्याच्या दिवशी स्तनपानाचे निरीक्षण करावे.
   - याचे खात्री करण्याकरिता पहिल्या दिवशी बालकाच्या घरी जाणे आवश्यक आहे.




# जन्माच्यावेळी अशक्तपणे जन्मास आलेले कोणतेही बालक आपल्यानजरेतून निसटणार नाही, याची खात्री कशी कराल?



- आपल्याकडे प्रत्येक गर्भवती महिलेची एल. एम. पी. आहे याची आपण खात्री कशी करू शकतो?

- जन्माच्या वेळी बालकाचे बरोबर वजन घेतले जाईल, याची खात्री कशी कराल?

- जन्माच्या वेळी बालकाचे वजन उपलब्ध नसेल आणि महिलेच्या एल. एम. पी. ची माहिती उपलब्ध नसेल तर काय करावे?



# पुढील महिन्यातील कार्यमुद्दा-१

## अशक्त बालक ओळखता यावे म्हणून जन्माच्या दिवशी प्रत्येक बालकाचे निरीक्षण करावे.

कार्यकर्त्यांना सांगावे.
अशक्त बालकाला आपण कशाप्रकारे ओळखू शकतो हे आता आपण सांगणार आहोत.

कार्ड दाखवा.
कोणत्याही एका कार्यकर्त्याला कार्ड वाचावयास सांगावे.
उजवीकडे दिलेल्या माहितीच्या आधारे याचा अर्थ काय होतो, हे सांगावे.

चर्चे नंतर विचारा:
तुमच्या हिशोबा नुसार एका अंगणवाडी केंद्रामध्ये एका वर्षात किती अशक्त बालके सापडू शकतात?

कार्यकर्त्यांना उत्तर देण्यास प्रोत्साहित करा. बरोबर उत्तर काहीसे असे असावयास हवे:
जन्माला येणाऱ्या १० पैकी एक बालक अशक्त पणे जन्माला येते. जर एका अंगणवाडी केंद्रामध्ये एका वर्षात २० प्रसूती होत असतील तर दरवर्षी त्याकेंद्रा मध्ये कमीतकमी २ अशक्त बालके सापडावयास हवीत.

शेवटी यावर भर द्या.
जेव्हा आपण सर्व बालकांची तपासणी करू तेव्हाच आपण अशक्त बालकांना ओळखू शकू. त्यामुळे प्रत्येक बालकाच्या घरी भेट देणे गरजेचे आहे. जितक्या लवकर आपण अशक्त बालकास ओळखू तितक्या लवकर आपण त्या बालकाला योग्य व आवश्यक देखभाल मिळेल या विषयी खात्री करू शकतो. त्यामुळे प्रत्येक बालकाचे त्याच्या जन्मदिनी निरीक्षण केले जाणे अत्यावश्यक आहे. नंतर खूप उशीर झालेला असेल.

आपण प्रत्येक बालकाच्या जन्मदिनी त्याच्या घरीभेट देऊ किंवा बालकाला इस्पितळातून घरी सोडण्याच्या दिवशी घरी भेट देऊ आणि आपण खालील गोष्टीं कडे लक्ष पुरवू:

1. जर बालकाचा जन्म इस्पितळात झाला असेल तर त्याच्या कुटुंबियांना इस्पितळात हे सांगण्यात आले आहे का, की त्यांच्या बालकाचा जन्म वेळे आधी झाला आहे किंवा ते बालक लहान व कमजोर आहे? जर याचे उत्तर 'हो' असेल तर त्यांना काय सांगण्यात आले होते आणि ते बालकाच्या अतिरिक्त देखभालीबद्दल सांगण्यात आलेल्या गोष्टींचे पालन करीत आहेत का?
2. बालकाचा गर्भकाळ किंवा जन्माच्या वेळी त्याचे असलेले वजन लिहिलेले डिस्चार्जकार्ड किंवा तत्सम दुसरा कागद कुटुंबाकडे आहे का? जर याचे उत्तर 'हो' असेल तर आपण याचा उपयोग बालक अशक्त तर नाहीना, हे जाणण्यासाठी करू.
3. जर बालकाचा जन्म घरीच झाला असेल किंवा इस्पितळात जन्म होऊनही त्याचे वजन दर्शविणारा कोणताही कागद इस्पितळाकडून कुटुंबाला देण्यात आलेला नसेल तर आपण स्वतःच ते शोधून काढू.
   - आपण योग्य वजन यंत्राचा वापर करून बालकाचे वजन करू व लिहू.
   - आपण आपल्या रजिस्टर मध्ये लिहिलेल्या डी. ओ. एम. च्या आधारेहे जाणून घेऊ की बालकाचा जन्म डी. ओ. एम. च्या आधी तरी झालेला नाहीना?
4. सर्व परिस्थितीत आपण प्रसूतीच्या पहिल्या दिवशी कमीतकमी एकदा तरी स्तनपानाचे निरीक्षण जरूर करू. यातून आपण खात्री करू शकू की बालक सुदृढ व सशक्त आहे की नाही.

बालक अशक्त आहे हे समजल्यावर खालील तीन गोष्टींना गृहभेट रजिस्टर मध्ये लिहून ठेऊ.

- जन्माच्या वेळी असलेले वजन
- जन्माच्यावेळी बालकाचा गर्भावस्थेतील महिना किंवा आठवडा.
- बालक योग्य प्रकारे स्तनपान करू शकत आहे की त्याला ताकद लावून स्तनपान करावे लागत आहे किंवा स्तनपान करणे त्याला अजिबातच जमत नाहीये.





# पुढील महिन्यातील कार्य मुद्दा- १


**अशक्त बालक ओळखता यावे म्हणून जन्माच्या दिवशी प्रत्येक बालकाचे निरीक्षण करावे.**

बालकाच्या जन्माच्या दिवशी आपण गृहभेटीच्या माध्यमातून खालील गोष्टींचे परीक्षण करू.

१. बालकाचा जन्म परिपक्वतेच्या कालावधीच्या आधीच झाला आहे का?

२. बालकाचे वजन २ किलोग्रॅम किंवा त्यापेक्षाही कमी आहे का?

३. बालक चांगल्या प्रकारे स्तनपान करीत आहे का?



# पुढील महिन्यातील कार्य मुद्दा - २

## अशक्त बालकांना अतिरिक्त देखभाल कशी मिळेल याची खात्री करा.

कार्यकर्त्यांना सांगा.

वेळे आधी जन्मलेल्या किंवा अतिशय कमी वजन असलेल्या बालकांची चांगली देखभाल एस. एन. सी. यु. सारख्या खास इस्पितळामध्येच होऊ शकते. परंतु काही ठिकाणी अशा प्रकारचे इस्पितळ उपलब्ध नसेल तर आपण घराच्याघरी बालकांची यथायोग्य काळजी घेऊन त्यांचे प्राण वाचवू शकतो.

दुसरा कार्यमुद्दा हाहे की, अशक्त बालकालाअतिरिक्त देखभाल मिळत आहे, याची खात्री करणे.

कार्ड दाखवा.

कोणत्याही एका कार्यकर्त्याला कार्ड वाचायला सांगा.

उजवीकडे दिलेल्या माहितीच्या आधारे याचा अर्थ समजावून सांगा.

चर्चे नंतर विचारा.

जर तुम्हाला समजले की, बालकाला स्तन चोखायला किंवा दूध गिळायला त्रास होतोय, तर तुम्ही काय कराल? आईकडून स्तनपानाचा प्रयत्न केला गेल्यावरही बालक तोंड उघडत नसेल किंवा स्तनपान करू शकत नसेल, तर तुम्ही काय कराल?

कार्यकर्त्यांना उत्तर देण्यासाठी प्रोत्साहित करा. त्यानंतर बरोबर उत्तर सांगा.

जे बालक स्तन चोखायला किंवा दूध गिळायला सक्षम नाहीत त्या बालकांच्या बाबतीत त्यांचा जन्म वेळेच्या खूप आधी झालेला असण्याची अधिक शक्यता असते. अशा बालकांची देखभाल घरी करता येत नाही. अशा बालकांना एस. एन. सी. यू. सारख्या योग्य इस्पितळामध्ये दाखल करण्यात यावे. जरी असे इस्पितळ दूरवर असेल तरीही अशा बालकांना तेथे दाखल करणे आवश्यक असते.

कोणतेही बालक अशक्त मान लेगेल्या नंतर आपण खालील बाबींचे निरीक्षण करू.

1.बालकाला पुरेशी ऊब मिळत आहे का?

- खोली मध्ये पुरेशी ऊब आहे का? खोली मध्ये हवा खेळती आहे का?
- बालकाला कांगारू देखभाल (के. एम. सी.) देता येऊ शकते का?
- बालकाला स्वच्छ व कोरड्या कापडा मध्ये चांगल्या प्रकारे गुंडाळण्यात आले आहे का? तसेच त्याला आई जवळ ठेवण्यात आले आहे का?
- कुटुंबाद्वारे बालकाला अंघोळ घालण्यात आली आहे का?

2. बालकाला पुरेशा प्रमाणात स्तनपान करण्यात येत आहे का?

- बालकाला दर तासाला जागोजागी स्तनपान करावयाचे आहे, इतकेच नव्हे तर रात्री देखील करावयाचे आहे, याची आईला माहिती आहे का?
- बालक कोणत्या अवस्थेत अधिक आरामात स्तनपान करू शकते, हे आईला ठाऊक आहे का?
- खोलीमध्ये कुटुंबाकडून बालकाला दूधपाजण्यासाठी कपाचा किंवा बाटलीचा उपयोग करण्यात आल्याचे निदर्शनास येत आहे का? (जर अशी एखादी वस्तू आढळल्यास तिला हटविण्यास सांगा.)

3.कुटुंबाकडून स्वच्छते करिता पुरेशी पाऊले उचलली जात आहेत का?

- बालकाला स्पर्श करण्याआधी कुटुंबीय हात स्वच्छ धुतात का?
- अनेक लोकांनी बालकाला स्पर्श करण्यास ते विरोध करीत आहेत का?
- बालकाची नाळ स्वच्छ व कोरडी आहे का?

जर कुटुंबाकडून वरील सावधगिरी बाबत कोणतीही चूक किंवा दिरंगाई होत असेल तर आपण त्यांना योग्य पद्धतींची माहिती देऊ आणि सोबतच आपण त्यांना हे सर्व करणे का गरजेचे आहे? हे देखील सांगू.



# पुढील महिन्यातील कार्य मुद्दा - २




## अशक्त बालकांना अतिरिक्त देखभाल कशी मिळेल याची खात्री करा.

कोणतेही बालक अशक्त मानले गेल्यानंतर आपण खालील बाबींची खात्री करू.

1. अतिरिक्त ऊब - कांगारू देखभाल व कमीतकमी ७ दिवस बालकाला अंघोळ घालण्यात येऊ नये.
2. अतिरिक्त स्तनपान - बालकाला अनेकदा उठवून स्तनपान करण्यात यावे.
3. अतिरिक्त स्वच्छता - बालकाला स्पर्श करण्यापूर्वी हात धुतलेले व स्वच्छ असावेत.

जर शक्य असेल तर आपण खात्री करू की, अशक्त बालकाची योग्य इस्पितळात देखभाल केली जाईल.



# पुढील महिन्यातील कार्य मुद्दा - ३

## अशक्त बालकाला किमान १ आठवड्यापर्यंत अतिरिक्त देखभाल मिळेल याची खात्री करा.

कार्यकर्त्यांना सांगा.

कुटुंबियांना विशेष देखभालीबद्दल केवळ एकदाच सांगणे पुरेसे नसते. एका अशक्तपणे जन्माला आलेल्या बालकाला स्तनपान करण्यायोग्य सशक्त बनण्यासाठी किमान एका आठवड्याचा कालावधी लागतो. बालकाकडून त्याच्या आवश्यकतेनुसार ताकद लावून दूध पिणेही बाब याचा संकेत असते की ते बालकआता धोक्यापासून सुरक्षित आहे. यादरम्यान अशा अनेकगोष्टी असतात ज्या कुटुंबियांना समजलेल्या नसतात किंवा ते विसरलेले असतात. यादरम्यान असेही घडू शकते की, कुटुंबीय त्यांचे धैर्य गमावून बसतील किंवा त्यांच्या हातून एखादी चूक घडेल. असेही घडू शकते की, ते अनावश्यक घरगुती उपचार सुरु करतील किंवा एखाद्या अयोग्य डॉक्टर कडून उपचार करवून घेतील. अशा परिस्थितीत जोपर्यंत बालकाच्या स्तनपानाच्या स्थितीमध्ये सुधारणा होत नाही, तसेच बालक झोपेतून उठून स्तनपान करण्यास सुरुवात करणार नाही व सुदृढ होणार नाही तोपर्यंत आपल्याला त्याकुटुंबाची मदत करावयाची आहे आणि त्यांचे मनोधैर्य वाढवायचे आहे. जोपर्यंत बालक त्याच्या आवश्यकतेनुसार ताकद लावून स्तनपान करण्यास सुरुवात करीत नाही तोपर्यंत आपण त्या कुटुंबाची सतत मदत करीत राहू, याची खात्री तिसऱ्या कार्य मुद्द्यामध्ये करावयाची आहे.

कार्ड दाखवा.
कोणत्याही एका कार्यकर्त्याला कार्ड वाचायला सांगा.
उजवीकडे दिलेल्या माहितीच्या आधारेयाचा अर्थ समजावून सांगा.

चर्चे नंतर विचारा.

पुढील धड्यांमध्ये आपण कांगारू देखभाल (के. एम. सी.) देण्याच्या योग्य पद्धती समजावून घेणार आहोत.

जर जन्माच्या पहिल्याच दिवशी बालक अशक्त असल्याचे आपण ओळखू शकलो आणि त्याची योग्य व विशेष देखभाल घेण्यास सुरुवात झाल्याची आपण खात्री करू शकलो तर आपण खालील गोष्टींचीही खात्री करू:

1. जोपर्यंत बालक त्याच्या आवश्यकतेनुसार ताकद लावून स्तनपान करण्यास सुरुवात करीत नाही तोपर्यंत आपण त्या कुटुंबाच्या घरी भेट देत राहू.
   - यासाठी साधारणपणे एका आठवड्याचा कालावधी लागतो. मात्र, कधी कधी याहून अधिक काळ ही लागू शकतो.
2. बालकाची योग्य देखभाल घेतली जात असल्याची प्रत्येक गृहभेटीच्या वेळी खात्री करा:
   - बालकाला योग्य ऊब देण्यात येत आहे आणि त्याला किमान एक आठवडा अंघोळ घालण्यात आलेली नाही.
   - त्याला योग्य प्रमाणात स्तनपान केले जात आहे आणि दूध पाजण्या साठी बाटलीचा उपयोग करण्यात येत नाही.
   - योग्य स्वच्छता, हातधुणे व नाळेची देखभाल.

या उद्देशपूर्तीसाठी कदाचित आपल्याला बालकाच्या घरी एकाच दिवशी अनेक वेळा भेट द्यावी लागेल.
जर गृहभेटी दरम्यान आपल्याला जाणवलेकी, बालकाचे स्तनपाना मधील स्वारस्य कमी झाले आहे किंवा त्याला दर तासाने उठविणे कठीण होत आहे, तर अशा वेळी आपण त्या कुटुंबाला सल्ला देऊ की, त्यांनी बालकाला एस. एन. सी. यू. सारख्या योग्य इस्पितळा मध्ये घेऊन जावे.



# पुढील महिन्यातील कार्यमुद्दा - ३



## अशक्त बालकाला किमान १ आठवड्यापर्यंत अतिरिक्त देखभाल मिळेल याची खात्री करा.

1. जोपर्यंत बालक त्याच्या आवश्यकतेनुसार ताकद लावून स्तनपान करण्यास सुरुवात करीत नाही तोपर्यंत आपण त्या कुटुंबाच्या घरी भेट देत राहू.
2. त्या बालकाची सदैव योग्य देखभाल घेतली जात असल्याची आपण खात्री करू.

1. ही मासिक बैठक कशासाठी?
2. गृहभेट योजना रजिस्टर कसे बनवावे किंवा त्यात माहिती कशी मांडावी. गृहभेटीची सुरुवात
3. अंगणवाडी केंद्रावर आयोजित सामुदायिक कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन
4. नवजात बालकांच्या स्तनपानाचे निरीक्षण- का व कसे?
5. अशक्त नवजात बालक ओळखणे आणि त्याची देखभाल.
6. वरचा आहार- भोजनातील विविधता
7. महिलांमधील ॲनिमियाचा प्रतिबंध
8. बालकांच्या शारीरिक वाढीचे आकलन
9. वाढत्या वयानुसार वरच्या आहारामध्ये सुधारणा व वाढ
10. केवळ स्तनपानाची खबरदारी घेणे
11. अशक्त नवजात बालकाची देखभाल- शेवटी किती अशक्त बालके आपल्या कडून सुटून जातात?
12. आपण वरच्या आहाराची सुरुवात करण्याच्या वेळेची खात्री कशी करावी?
13. गंभीर अशक्तपणा कसा ओळखावा व थांबवावा?
14. आजारपणा दरम्यान बालकाचा आहार
15. स्तनपाना संबंधी समस्यांमध्ये मातेला सहकार्य
16. कांगारू मदर केअरच्या मदतीने अशक्त बालकाची देखभाल कशी करावी?
17. आजारी नवजात बालकाचा शोध व संदर्भ सेवा
18. कुपोषण व मृत्यू पासून बचाव करण्यास्तव आजारांपासून संरक्षण
19. बालके व तरुणींमध्ये रक्ताची कमतरता / ॲनिमियाचा प्रतिबंध
20. प्रसुतीपूर्व तयारी- दवाखाना व घरी होणाऱ्या प्रसूतीसाठी
21. गर्भावस्थे दरम्यानची तयारी- नवजात बालकाची देखभाल व कुटुंब नियोजन

